महाराष्ट्र शासन
**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

**अतितात्काळ/कालमर्यादा**

क्र. पोमसं/१६/३६९९/कवृंप-५५ वी सभा/४८/२०१६ मुंबई, दि. ०५/०४/२०२४

संदर्भ:- शासन निर्णय, गृह विभाग, क्र.टीईएक्स ०५८२(आर.एम.)/पोल-५, दि.२४/०८/१९८३

**विषय:- राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषद ५५ वी सभा**
पोलीसांची गा-हाणी सोडविण्याकरीता उभारण्यात आलेली यंत्रणा-
पोलीस कर्मचारी वृंद परिषदेच्या सभासदांची मुख्यालयाच्या स्तरावर निवड करण्याबाबत.

***

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषद ५५ वी सभा दि.२२/०५/२०२४ रोजी ११.३० वा. पोलीस मुख्यालयात आयोजित करण्यात आली आहे.

२. या कार्यालयाच्या क्र.पोमसं/१६/३६९९/क.वृ.प-५३ वी सभा/४८/२०१६, दि.१९/०५/२०२१ च्या ज्ञापनान्वये, मुख्यालयाच्या स्तरावरील सभासदांची निवड करण्यात आली होती. सदरची मुदत दि.३०/०४/२०२३ रोजी संपुष्टात आलेली असल्यामुळे नवीन सभासदांची, पुढील ०२ वर्षाच्या कालावधीसाठी पोलीस कर्मचारी वृंद परिषदेच्या सभासदांची खालीलप्रमाणे नव्याने नियुक्त करावयाची आहे:-

| अ.क्र. | सभासद निवडीचे पद | संख्या | घटक कार्यालय |
|---|---|---|---|
| १ | पोलीस अधीक्षक | १ | |
| २ | सहायक पोलीस आयुक्त / पोलीस उपअधीक्षक | २ | |
| ३ | पोलीस निरीक्षक | ३ | |
| ४ | पोलीस उपनिरीक्षक | ५ | |
| ५ | पो.हवा/पो.नाईक/पो.शिपाई | ८ | |
| ६ | पो.हवा/पो.नाईक/पो.शिपाई (रा.रा.पो.बल मधील अंमलदार) | २ | |
| ७ | महिला पोलीस अंमलदार प्रतिनिधी (१ म.पो.हवा., व १ म.पो.शि.) | २ | |
| | एकूण सभासद | २३ | |

३. सर्व घटक प्रमुखांनी नवीन सभासदांच्या नियुक्तीसाठी, ज्यांचा सेवा अभिलेख अत्युत्कृष्ट आहे, अशा पोलीस अधिकारी/अंमलदारांच्या नावांची शिफारस खाली दर्शविल्याप्रमाणे करावी:-

| | | | |
|---|---|---|---|
| १ | पोलीस अधीक्षक | :- | पोलीस महासंचालक यांचेकडून करण्यात येईल. |
| २ | सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उपअधीखक | :- | पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी ३ सहायक पोलीस आयुक्तांच्या नावाची शिफारस करावी. तसेच, प्रत्येक परिक्षेत्राच्या विशेष पोलीस महानिरीक्षकांनी प्रत्येकी एका उपअधीक्षकांच्या नावाची शिफारस करावी. |
| ३ | पोलीस निरीक्षक | :- | प्रत्येक परिक्षेत्राच्या विशेष पोलीस महानिरीक्षक व पोलीस आयुक्तांनी प्रत्येकी एका पोलीस निरीक्षकाच्या नावाची शिफारस करावी. |
| ४ | पोलीस उपनिरीक्षक | :- | परिक्षेत्राचे तसेच मोटार परिवहन, विभाग, बिनतारी संदेश व प्रशिक्षण, रा.रा.पो.बल यांचे अपर पोलीस |

Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| | | | महासंचालक/विशेष पोलीस निरीक्षकांनी प्रत्येकी ३ पोलीस उपनिरीक्षकांच्या नावांची शिफारस करावी. |
| ५ | पो.हवा/पो.नाईक/पो.शिपाई | :- | प्रत्येक घटक प्रमुखाने १ पोलीस हवालदार व १ पोलीस शिपायाच्या नावाची शिफारस करावी. |
| ६ | पो.हवा/पो.नाईक/पो.शिपाई (रा.रा.पो.बल मधील अंमलदार) | :- | विशेष पोलीस महानिरीक्षक, रा.रा.पो.बल, पुणे व नागपूर यांनी प्रत्येकी ३ पोलीस हवालदार व ३ पोलीस शिपायांच्या नावांची शिफारस करावी. |
| ७ | महिला पोलीस अंमलदार प्रतिनिधी (१ म.पो.हवा., व १ म.पो.शि.) | :- | पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, नागपूर, पुणे व औरंगाबाद यांनी प्रत्येकी २ महिला पोलीस हवालदार, विशेष पोलीस महानिरीक्षक यांनी प्रत्येकी २ महिला पोलीस शिपायांच्या नावांची शिफारस करावी. |

४. यासंबंधी विभाग प्रमुख/परिक्षेत्रे व घटक प्रमुखांचे लक्ष या कार्यालयाच्या गोपनीय परिपत्रक क्र.२१/३६९९, दि.०३/११/१९८३ कडे वेधण्यात येत असुन सदर परिपत्राकामधील सूचना/निर्देशांनुसार राज्यस्तरीय कर्मचारी वृंद परिषदेकरीता नवीन सभासदांच्या नियुक्तीसाठी पोलीस अधिकारी/अंमलदारांच्या नावांची शिफारस खालील विवरणपत्रामध्ये सविस्तर माहितीसह कृपया दिनांक १५/०४/२०२४ पूर्वी न चुकता कार्यालयास पाठवावी:-

| अ. क्र. | नांव व पदनाम | नेमणूक | बक्षिसे | शिक्षा | | मागील ५वर्षाचे शेरे | | | | | विभाग प्रमुख/परिक्षेत्र प्रमुख व घटक प्रमुखांचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | लहान | मोठी | २०१९ | २०२० | २०२१ | २०२२ | २०२३ | |
| | | | | | | | | | | | |

५. तसेच, घटक प्रमुख यांनी ५५ व्या कर्मचारी वृंद परिषदेत चर्चा करण्यासाठी नविन मुद्दे कार्यालयाचे ई-मेल क्र. desk16.dgoffice@mahapolice.gov.in तथा ई-ऑफिसवर दि.१६/०४/२०२४ पर्यंत सत्वर पाठविण्यात यावे. सदरचे मुद्दे यापुर्वीच्या सभेत चर्चिले गेलेले आहेत किंवा कसे, तसेच, सदरहू विषय राज्य स्तरावरील पोलीस कर्मचारी वृंद परिषदेत चर्चेसाठी खरोखरच आवश्यक व योग्य आहेत किंवा कसे, म्हणजेच स्थानिक/वैयक्तीक विषयांशी संबंधीत नाहीत, याबाबतची पूर्ण/काळजीपूर्वक छाननी व खातरजमा करुनच मुद्देसुद अभिप्राय पाठवावेत. तसेच, पोलीस कल्याण निधी उपक्रमांतर्गत प्रयोजनार्थ पोलीस कल्याण निधीच्या विनीयोगांशी संबधीत मुद्दे वगळून पाठवावेत, म्हणजे अनावश्यक पत्रव्यवहार टाळता येईल.

Signed by Arti Singh
Date: 05-04-2024 17:50:17
Reason: Approved

(डॉ.आरती सिंह)
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक, म. राज्य, मुंबई यांचेकरीता.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह)
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह)
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, म. राज्य, मुंबई (सस्नेह)
पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक, म.राज्य, मुंबई.(सस्नेह)
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह व बृहन्मुंबई वगळून)

Scanned with OKEN Scanner

आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषन विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक, कायदा व सुव्यवस्था/ विशेष कृती / प्रशिक्षण व खास पथके/फोर्स वन/ महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग/नागरी हक्क संरक्षण/रा.रा.पो.बल/आर्थिक गुन्हे शाखा, म.राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक तथा संचालक, दळवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक/महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे.
विशेष पोलीस महानिरीक्षक, फोर्स वन/ नागरी हक्क संरक्षण/महिला अत्याचार प्रतिबंधक/ सायबर गुन्हे/सागरी सुरक्षा व विशेष सुरक्षा, रा.गु.वि/व्ही.आय.पी.सुरक्षा, रा.गु.वि./विशेष सुरक्षा विभाग, दादर, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन विभाग,महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक.
विशेष पोलीस महानिरीक्षक,नक्षल विरोधी अभियान,नागपूर/राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.
पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर/अमरावती/नांदेड.
पोलीस उपआयुक्त, सशस्त्र पोलीस प्रशिक्षण , क्रिडा व कल्याण , कलिना, सांताक्रुझ (पुर्व), मुंबई.
सर्व पोलीस अधीक्षक(लोहमार्ग/मोटार परिहन विभाग / दळवळण व परिवहन /विशेष कृती/नागपूरसह)
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १९.
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालये.
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रकटीकरण केंद्र, नाशिक.
पोलीस अधीक्षक, शस्त्र निरीक्षण शाखा, पुणे.

**प्रत महितीकरीता,**

अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे स्वीय सहायक

प्रत माहितीकरीता,

पोलीस उपअधीक्षक, संगणक शाखा, पो.म.सं., महाराष्ट्र राज्य, मुंबई

२. सदरहू पत्र mahapolice.gov.in या वेबसाईटवर दि.२१/०५/२०२४ पर्यंत ठेवण्यात यावे.

**(मराठी शिर्षक- ५५ वी राज्य स्तरीय कर्मचारी वृंद परिषद/ English Titel- 55 State Staff Council )**

Scanned with OKEN Scanner